परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांच्याशी भेट

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्ली येथे कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री सुश्री अनिता आनंद यांची भेट घेतली.

2. या बैठकीदरम्यान दोन्ही मंत्र्यांनी द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी आणि भारत-कॅनडा धोरणात्मक भागीदारीच्या प्रमुख क्षेत्रांमधील सहकार्य पुढे नेण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. त्यांनी सुरक्षा व संरक्षण सहकार्य वाढवणे तसेच ऊर्जा सहकार्याचा विस्तार करणे यावर सविस्तर विचारविनिमय केला.

3. मंत्र्यांनी आपली आर्थिक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या, द्विपक्षीय व्यापाराचा विस्तार करण्याच्या तसेच शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, लोकांमधील परस्पर संबंध आणि बहुपक्षीय मंचांवरील सहकार्य पुढे नेण्याच्या संधींवरही चर्चा केली. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर त्यांनी आपापले दृष्टिकोन सामायिक केले.

4. दोन्ही देशांमधील उच्च-स्तरीय संवादातील सातत्य टिकवून ठेवण्याच्या आणि त्याचे रूपांतर मूर्त परिणामांमध्ये करण्याच्या महत्त्वावर दोन्ही मंत्र्यांनी भर दिला. तसेच, सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावरील (सीईपीए) वाटाघाटी लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दिशेने झालेल्या प्रगतीचे त्यांनी कौतुक केले.

5. या बैठकीने भारत आणि कॅनडाच्या जनतेला प्रत्यक्ष लाभ मिळवून देणारी एक रचनात्मक आणि भविष्यवेधी भागीदारी पुढे नेण्याच्या दोन्ही बाजूंच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

नवी दिल्ली

14 ऑक्टोबर 2026